मोदींकडून पाकिस्तान लक्ष्य

दहशतवाद्यांना मदत केल्यास कारवाईची मागणी

पीटीआय, बिश्केक

दहशतवादाला खतपाणी घालून त्यासाठी आर्थिक मदत करणाऱ्या देशांना दहशतवादी कारवायांसाठी जबाबदार ठरवले गेले पाहिजे, त्यांना अन्य देशांनी वेगळे पाडले पाहिजे, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानवर अप्रत्यक्षपणे हल्ला चढवला. शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन (एससीओ) या संघटनेच्या शिखर बैठकीत मोदी यांनी शुक्रवारी या संघटनेची उद्दिष्टे व आदर्श यांवर भर देताना दहशतवादाचा मुकाबला करण्यात सहकार्य वाढवण्याच्या मुद्द्याकडे सगळ्यांचे लक्ष वेधले.

दहशतवादमुक्त समाजाचे भारत समर्थन करतो, असे सांगून मोदी म्हणाले,की गेल्या आठवड्यात आपण श्रीलंकेतील दहशतवादी हल्ला झालेल्या सेंट अँटनी चर्चला भेट दिली. तेथे दहशतवादाचा उग्र चेहरा सामोरा आला. जगात सगळीकडेच निरपराध लोक दहशतवादास बळी पडत आहेत.

दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी विविध देशांनी त्यांच्या संकुचित मनोवृत्तीतून बाहेर पडून काम केले पाहिजे, असा टोला त्यांनी तेथे उपस्थित असलेले पाकिस्तानचे पंतप्रधान इमरान खान यांना अप्रत्यक्षपणे लगावला. जे देश दहशतवादाला खतपाणी घालून निधी पुरवतात त्यांना उत्तरदायी ठरवले गेले पाहिजे, असे ते म्हणाले.

'शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन'च्या सदस्य देशांची स्थिरता आणि सुरक्षेसाठी अफगाणिस्तानची सुरक्षितता व भरभराट महत्त्वाची आहे, असे मोदी यांनी सांगितले. अफगाणिस्तानमधील लोक व तेथील सरकार यांना भारताचा खंबीर पाठिंबा आहे. शांघाय सहकार्य परिषदेनेही अफगाणिस्तान संपर्क गटाच्या माध्यमातून अफगाणिस्तानच्या विकासाचा आराखडा तयार केला आहे. या संघटनेच्या सर्वच कामांमध्ये भारताने सकारात्मक भूमिका पार पाडली आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

मोदी यांचे गुरूवारी बिश्केक येथे आगमन झाले.

दहशतवादाविरोधात जागतिक परिषदेची सूचना

शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन या संस्थेच्या प्रादेशिक दहशतवादविरोधी यंत्रणे अंतर्गत सदस्य देशांनी दहशतवादविरोधी उपाययोजनांत सहकार्य केले पाहिजे. या संघटनेच्या नेत्यांनी दहशतवादाविरोधात जागतिक परिषदेचे आयोजन करावे, अशी सूचना नरेंद्र मोदी यांनी केली. ते म्हणाले, की साहित्य व संस्कृती यातून समाजाला सकारात्मक दिशा मिळते. त्यातून मूलतत्त्ववादीकरण थांबते.

ओमानच्या आखातातील हल्ल्यांनंतर तेलाच्या दरात वाढ

न्यूयॉर्क : ओमानच्या आखातात तेल टँकरवर हल्ल्याच्या घटना घडल्यानंतर पश्चिम आशियात तणाव निर्माण झाला असून जगात तेलाचे दर ४.५ टक्के वाढल्याने तेल कंपन्यांच्या शेअरचे भावही वधारले. अमेरिकेने दिलेले व्याज दरकपातीचे संकेतही याला कारणीभूत आहेत.

ओमानच्या आखातात दोन तेल टँकरवर करण्यात आलेल्या हल्ल्यात इराणचाच हात आहे, असा आरोप अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री माइक पॉम्पिओ यांनी केला आहे. इराणने हा आरोप अमान्य केला आहे.

बंगालमध्ये राहायचे असेल, तर बंगाली बोला- ममता

पीटीआय, कांचरापारा

बंगालमध्ये ज्यांना राहायचे आहे, त्यांनी बंगाली बोलणे शिकलेच पाहिजे, असा इशारा पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी दिला आहे. भाजप येथील बंगाली आणि अल्पसंख्याकांना लक्ष्य करून बंगालमध्ये 'गुजरात मॉडेल' राबवून सत्ता हस्तगत करू पाहात आहे, असा आरोप त्यांनी केला आहे. बंगालमध्येच बंगाली लोक बेघर झालेले कधीही खपवून घेतले जाणार नाही, असे त्या म्हणाल्या.

बंगालमधील परप्रांतीय लोकांना खडे बोल सुनावण्याच्या बहाण्याने तृणमुल काँग्रेसच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी यांनी भारतीय जनता पक्षाला लक्ष्य केले. उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील कांचरापारा येथील सभेत त्या बोलत होत्या. हा भाग तृणमुल काँग्रेसमधून नुकतेच भाजपमध्ये गेलेले नेते मुकुल रॉय यांचा आहे.

बॅनर्जी म्हणाल्या, आपल्याला बंगालीला पुढे न्यायचे आहे. मी दिल्लीला जाते तेव्हा हिंदीत, पंजाबला गेल्यावर पंजाबीत बोलते. त्याचप्रमाणे तुम्ही जेव्हा बंगालमध्ये येता तेव्हा तुम्हाला बंगाली आलेच पाहिजे. येथे येऊन बंगालींनाच मारहाण कराल तर खपवून घेतले जाणार नाही.

ठाणे महानगरपालिका, ठाणे

चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था
प्रवेश प्रक्रीया-२०१९

सद्यास्थितीत संस्थेमध्ये केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या यु. पी. एस. सी. नागरी सेवा परीक्षा - २०२० च्या पुर्व प्रशिक्षण वर्गाची प्रवेश प्रक्रीया सुरु असुन रविवार, दि.-३०/०६/१९ रोजी प्रवेश परीक्षा घेण्यांत येणार आहे. याबाबत सदर प्रवेश प्रक्रीयेची जाहिरात दि.-२९/०५/१९ रोजीच्या लोकसत्ता, लोकमत, महाराष्ट्र टाईम्स व ठाणे वैभव या वर्तमानपत्रांत तसेच संस्थेच्या व ठाणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत आली होती. संस्थेच्या प्रवेश परीक्षेसाठी अर्ज सादर करण्याचा कालावधी हा दि.- ०१/०६/१९ ते १५/०६/१९ असा होता. परंतु अर्जदारांच्या सोयीसाठी अर्ज सादर करण्यांची मुदत वाढविण्यांत येत असुन अर्ज स्विकारण्याचा अंतिम दि.-२०/०६/१९ असेल.

ठामपा/पिआरओ/चिदेप्रप्रस/२२३/२०१९-२० सही/-
दि:१४.०६.२०१९ माहिती व जनसंपर्क अधिकारी,
pls visit our official web-site ठाणे महानगरपालिका,ठाणे
www.thanecity.gov.in
सार्वजनिक ठिकाणी थुंकू नका, थुंकू देऊ नका... !!

ठाणे महानगरपालिका, ठाणे

समाज विकास विभाग
निविदा सूचना

ठाणे महानगरपालिका, ठाणे समाज विकास विभागातील "महिला व बालकल्याण कार्यक्रम " महिला व बालकल्याण योजना क्र.६(ई) नुसार ठामपा क्षेत्रातील शैक्षणिक संस्था/शासकीय कार्यालय/सार्वजनिक प्रसाधन गृहामध्ये सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिग तसेच सॅनिटरी नॅपकिन उपलब्ध करुन देणे. कामाकरिता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा सूचना व प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in वर दि. १५/०६/१९ दि.२९/०६/ १९ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळ येथे दिनांक २९/०६/१९ रोजी पर्यंत सायं.१६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.निविदा दि. ०२/०७/१९ सायं.१६.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधींसमक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/समाज/२३०/१९-२० सही/-
दि:१४.०६.२०१९ कार्यकारी अभियंता
pls visit our official web-site ठाणे महानगरपालिका,ठाणे
www.thanecity.gov.in
सार्वजनिक ठिकाणी थुंकू नका, थुंकू देऊ नका... !!

ठाणे महानगरपालिका, ठाणे

सा.बा. विभाग
फेर निविदा

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मुंब्रा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्र. ३२ मधील अलमास कॉलनी येथे वफा पार्कच्या मागे आशियाना बिल्डिंग जवळ शासनाचा भुखंड सर्व्हे क्र. १४३/३ येथे दवाखाना व डायलीसीस सेंटर बांधणे. या कामाकरिता प्रतीसाद न मिळाल्याने दि. १५/०६/१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळ येथे https:://mahatenders.gov.in येथे दि.०५/०७/१९ रोजी पर्यंत सायं.१६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. सदर निविदा दिनांक ०६/०७/१९ सायं. १६.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील. पुर्वीच्या निविदा सुचनेमधील इतर मजकुर अटी व शर्ती निविदेमध्ये नमुद केल्याप्रमाणे राहतील.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-मु/२२५/१९-२० सही/-
दि:१४.०६.२०१९ नगर अभियंता
pls visit our official web-site ठाणे महानगरपालिका,ठाणे
www.thanecity.gov.in
सार्वजनिक ठिकाणी थुंकू नका, थुंकू देऊ नका... !!

ठाणे महानगरपालिका, ठाणे

दादोजी कोंडदेव क्रिडा प्रेक्षागृह
फेरनिविदा सुचना

ठाणे महानगरपालिकेचे नव्याने तयार करण्यात आलेले मुंब्रा-कौसा येथिल मा.मौलाना अब्दुल कलाम आझाद क्रिडा संकुलामध्ये FIFA मानांकनानुसार आर्टीफिशियल फुटबॉल टर्फ उभारणेकरिता निविदा मागविण्यात येत आहे. निविदा सुचना, प्रपत्र व अटी शर्ती अधिकृत संकेत स्थळ https://mahatender.gov.in. वर दि.१५/०६/१९ पासुन दि. २९/०६/१९ पर्यंत उपलब्ध आहे. शासन मान्य अंगिकृत संस्था तसेच उपक्रम यांनी सुध्दा मनपाच्या अटी-शर्तीस अधिन राहून निविदा भरण्यास हरकत नाही. ऑनलाईन निविदा सदर संकेतस्थळावर दि. २९/०६/१९ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. सदरच्या निविदेचा लिफाफा क्र.१ (टेक्नीकल बिड) दि. ०१/०७/१९ रोजी सायं. ४.००वा. उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/दा.कों.क्रि.प्रे./२२१/१९-२० सही/-
दि:१४.०६.२०१९ उप-आयुक्त (क्रिडा)
pls visit our official web-site ठाणे महानगरपालिका, ठाणे
www.thanecity.gov.in
सार्वजनिक ठिकाणी थुंकू नका, थुंकू देऊ नका... !!

बृहन्मुंबई महानगरपालिका

वृक्ष प्राधिकरण
जाहीर सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ (जानेवारी २०१८ सुधारलेला) कलम ८ (३) (क) मधील तरतुदीनुसार, **परिमंडळ-२** मधील 'जी/दक्षिण' विभागातील **०१** प्रस्ताव, 'जी/उत्तर' विभागातील **०१** प्रस्ताव, **परिमंडळ-४** मधील 'पी/दक्षिण' विभागातील **०२** प्रस्ताव, **परिमंडळ-५** मधील 'एम/पश्चिम' विभागातील **०१** प्रस्ताव, **परिमंडळ-६** मधील 'एन' विभागातील **०२** प्रस्ताव, 'एस' विभागातील **०१** प्रस्ताव म्हणजेच एकूण **०८** प्रस्ताव, म.न.पा. आयुक्त, अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण/वृक्ष प्राधिकरण समिती यांच्या मंजुरीकरिता प्राप्त झाले आहेत.

उपरोक्त प्रस्तावांमधील झाडे कापणे/पुनर्रोपित करण्याबाबत तपशील हा म.न.पा.च्या **mcgm.gov.in** बृहन्मुंबई महानगरपालिकेविषयी ⇨ विभाग आणि खाते ⇨ खातेनिहाय माहिती पुस्तिका ⇨ उद्याने व वृक्ष प्राधिकरण ⇨ कागदपत्रे ⇨ जाहीर सूचना ७ दिवस, या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

उपरोक्त प्रस्तावांविषयी नागरिकांच्या काही आक्षेप वा सूचना असल्यास सदर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी यांच्या कार्यालयात सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या आक्षेप/सूचनेचा विचार करण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. सदर आक्षेपाबाबतची सुनावणी दि. **२५.६.२०१९** रोजी उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी यांच्या कार्यालयात दुपारी २.३० ते ३.०० वाजेदरम्यान घेण्यात येईल.

उद्यान अधीक्षक यांचे कार्यालय,
वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग,
भायखळा (पूर्व), मुंबई-४०००२७. दूरध्वनी क्रमांक : २३७४२१६२,
E-mail : sg.gardens@mcgm.gov.in
सही/-
उद्यान अधीक्षक
व वृक्ष अधिकारी
पीआरओ/**२९५**/एडीव्ही/१९-२० **पाण्याची बचत करा**

भारत सरकार
भाभा अणू संशोधन केंद्र
जन संपर्क विभाग
निविदा मागविणारी सूचना
निविदा सूचना क्र. बीएआरसी/पीडी/पीआरओ/२०१९/८४

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने जनसंपर्क विभाग अधिकारी, भाभा अणू संशोधन केंद्र, ट्रॉम्बे, मुंबई यांच्याद्वारा निविदा कागदपत्रांत विनिर्दिष्ट शर्ती व अटींच्या अनुसार मॉडेल-२०१६ किंवा नंतरच्या वर्षातील मारुती स्वीफ्ट/इंडिगो (४ सिटर क्षमता), होंडा सिटी/टोयाटो इटिओस, मारुती स्वीफ्ट डी'झायर/ मारुती सुझुकी सियाझ/ टव्हेरा (चेव्हरोलेट), सुमो ग्रँडे/ स्कॉर्पिओ/ झायलो/ इर्टिगा / टोयोटा इन्नोव्हा आणि क्रिस्टा / होंडा सिव्हीक/ मर्सिडीज बेंझ/ फोक्स व्हॅगन/ होंडा ॲकॉर्ड यासारखी वाहने भाड्याने घेण्याकरिता पात्रता कसोट्यांची पूर्तता करीत असणाऱ्या नामांकित कंत्राटदार / वाहतूकदार/ ट्रान्स्पोर्ट एजन्सीजकडून **"जेव्हा आवश्यकता भासेल तेव्हा"** या तत्त्वावर दोन भागांत, (१) भाग ए- तांत्रिक बोली व (२) भाग बी- वित्तीय (किंमत) बोली, मोहोरबंद निविदा मागविण्यात आल्या आहेत. वाहनांचा वापर महाराष्ट्र राज्य एरिआच्या आत आणि मुंबईच्या बाहेर बीएआरसी अधिकाऱ्यांना प्रवास करण्याकरिता करण्यात येईल आणि मुंबई शहराच्या आत मुलाखतीकरिता विदेशी प्रतिनिधी/ तज्ज्ञांच्या परिवहनाकरितासुद्धा वापर केला जाईल. निविदा कागदपत्रे/ सविस्तर विनिर्देश **http://www.barc.gov.in/tenders** या भारत सरकारच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येईल. निविदा कागदपत्रांच्या सादरीकरणाची शेवटची तारीख **२५.६.२०१९** रोजी **दु. २.०० वा.** आहे.

स्वाक्षरी/-
जनसंपर्क अधिकारी

दिनांक १६.०६.२०१९ रोजी मेगा ब्लॉक

मध्य रेल्वेच्या मेन मार्ग आणि हार्बर मार्गावर देखभाल कामे करण्याकरिता **रविवार दिनांक १६.०६.२०१९** रोजी खाली दर्शविल्याप्रमाणे **मेगा ब्लॉक** घेण्यात येईल.

माटुंगा-मुलुंड डाऊन धीम्या मार्गावर
सकाळी ११.२० ते दुपारी ३.५० वाजेपर्यंत

- सकाळी १०.५७ वाजेपासून दुपारी ३.५२ वाजेपर्यंत माटुंगा स्थानक येथून सुटणारी डाऊन धीम्या मार्गावरील सर्व गाड्या माटुंगा-मुलुंड स्थानकांदरम्यान डाऊन जलद मार्गावर चालविण्यात येतील आणि या गाड्या शीव, कुर्ला, घाटकोपर, विक्रोळी, भांडुप आणि मुलुंड स्थानकांवर थांबतील आणि माटुंगा येथून अप धीम्या मार्गावरून चालवल्या जातील.
- डाऊन धीम्या मार्गावरील गाड्या विद्याविहार, कांजुरमार्ग आणि नाहुर स्थानकांवर थांबणार नाहीत. या स्थानकांच्या प्रवाशांना घाटकोपर, भांडुप आणि मुलुंड स्टेशन मार्गे प्रवास करण्याची परवानगी दिली जाईल.
- सकाळी १०.५४ ते दुपारी ०३.०६ वाजेपर्यंत कल्याण येथून सुटणारी अप जलद / अर्ध जलद मार्गावरील गाड्या आपल्या निर्धारित थांब्यांव्यतिरिक्त दिवा, मुलुंड, भांडुप, विक्रोळी, घाटकोपर आणि कुर्ला स्थानकांवर थांबतील आणि आपल्या शेवटच्या स्थानकांवर १५ मिनिटे उशिराने पोहोचतील.
- सकाळी १०.४८ वाजेपासून दुपारी ३.४० वाजेपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून सुटणाऱ्या डाऊन जलद / अर्ध जलद मार्गावरील गाड्या आपल्या निर्धारित थांब्यांव्यतिरिक्त घाटकोपर, विक्रोळी, भांडुप, मुलुंड आणि दिवा स्थानकांवर थांबतील आणि आपल्या शेवटच्या स्थानकावर २० मिनिटे उशिराने पोहोचतील.
- सकाळी ११.०० वाजेपासून सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून सुटणाऱ्या / पोहोचणाऱ्या धिम्या गाड्या आपल्या शेवटच्या स्थानकावर १० मिनिटे उशिराने पोहोचतील.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - चुनाभट्टी / वांद्रे डाऊन हार्बर मार्गावर सकाळी ११.४० वाजेपासून ते दुपारी ४.१० वाजेपर्यंत आणि चुनाभट्टी / वांद्रे - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस अप हार्बर मार्गावर सकाळी ११.१० वाजेपासून ते दुपारी ३.४० वाजेपर्यंत

- सकाळी ११.३४ वाजेपासून दुपारी ४.२३ वाजेपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई / वडाळा रोड येथून वाशी / बेलापूर / पनवेल साठी सुटणाऱ्या डाऊन हार्बर मार्गावरील गाड्या आणि सकाळी ९.५६ वाजेपासून दुपारी ४.१६ वाजेपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून वांद्रे/गोरेगाव साठी सुटणाऱ्या डाऊन हार्बर मार्गावरील गाड्या रद्द राहातील.
- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई करिता सकाळी ९.५३ वाजेपासून दुपारी २.४४ वाजेपर्यंत पनवेल / बेलापूर / वाशी येथून आणि सकाळी १०.४५ वाजेपासून दुपारी ४.५८ वाजेपर्यंत गोरेगाव / वांद्रे येथून सुटणाऱ्या अप हार्बर मार्गावरील गाड्या रद्द राहातील.
- तथापि, ब्लॉक कालावधीदरम्यान पनवेल आणि कुर्ला (फलाट क्र. ८) दरम्यान विशेष गाड्या चालविण्यात येतील.
- हार्बर मार्गावरील प्रवाशांना ब्लॉक कालावधीदरम्यान सकाळी १०.०० ते सायं, ६.०० वाजेपर्यंत मेन मार्ग आणि पश्चिम रेल्वेद्वारे प्रवास करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

या रेल्वे ब्लॉकमुळे उपनगरीय गाड्यांमध्ये साधारण दिवसांपेक्षा जास्त गर्दी होण्याची शक्यता आहे. प्रवाशांना विनंती आहे की प्रवासादरम्यान कोणतीही जोखीम घेऊ नये. त्यांना अशीही विनंती आहे की त्यांनी कृपया फुटबोर्ड, छत तसेच जास्त गर्दीच्या गाडीमधून प्रवास करू नये. देखभालीचा हा मेगा ब्लॉक आधारभूत संरचनेला मजबूत ठेवण्याकरीता तसेच सुरक्षेकरीता अत्यंत उपयोगी आहे.

मध्य रेल्वे
www.cr.indianrailways.gov.in
www.facebook.com/centralrailwayindia
www.twitter.com/Central_Railway
310
उज्ज्वल भविष्याकरिता कार्यरत

भारत सरकार
अणू ऊर्जा विभाग
भाभा अणू संशोधन केन्द्र
तांत्रिक सेवा विभाग
उत्तर बाजू, ट्रॉम्बे, मुंबई-४०० ०८५

ई-निविदा मागविणारी सूचना
रिव्हिजन/एक्स्टेन्शन

निमासू क्र. भाअसंकें/तांसेवि/१०/२०१८-१९. कामाचे नाव: आरएमसी परेल येथे वातानुकूलन यंत्रणा (स्प्लिट आणि विण्डोज), कोल्ड स्टोरेज, रेफ्रिजरेटर्स, डीप फ्रीजर्स आणि वायुविजन साहित्याची वार्षिक सर्वसाधारण देखभाल.

कालावधीपर्यंत वाढविण्यात आला आहे : २८.०६.२०१९ (१५.०० वा.)
निविदा समाप्तीचा जुना दिनांक आणि वेळ : १७.०७.२०१९ (२३.५९ वा.)

बोली अर्ज आणि अन्य तपशील **www.tenderwizard.com/DAE** किंवा **www.barc.gov.in** या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे.
साहाय्य/स्पष्टीकरणासाठी २४×७ वर @ ९९६९३९५५२२ श्री. रुद्रेश यांच्याशी संपर्क करा. ई-मेल : **rudresh.tenderwizard@gmail.com**

अधीक्षक अभियंता

TATA MOTORS LTD.
SCRAP FOR SALE DATED 21.06.2019

Arising Lots – MS Sheet Offcut (800 MT), MSTB (60 MT), CITB (260 MT), Structural Steel (280 MT), Sheet Metal (150 MT), Plastic (90 MT), Wood (30 MT), Fastener (50 MT) etc.
Arrange Lots – Rubber Glass, Coils, Radiators, Stainless Steel, Safety Shoes, etc.
Hazardous Lots – Plastic Barrels, Motors, Almn Turning & Boring, Aluminium Parts etc.
Used Machines – Oerlikon Gear Generation, Bearing Preloading SPM, Lapping Lathe, Angular Wheel Head Grinder, Nagel Honing Transfer Line, Internal Face & Cone Grinding, Vertical Milling, Center Lathe, Column Drilling, HMT Lathe, Hacksaw, Dies & Fixtures, Toolings etc.
Used Registered Vehicles – Maruti 800, Forklift, Nano, Indica, Indigo, Zen Estilo, Maruti Versa, Sumo Ambulance etc.
NOTE : 1) Demand Draft for Earnest Money Deposit (EMD) to be drawn on Nationalized Bank only. 2) Refer tender form for description, EMD amount & other details,
Inspection : From 15th to 21st June'19 between 10:00 AM to 3:30 PM. (Except Sunday) Helpdesk: (020) 66132457, e-mail disposal.cell@tatamotors.com
Tender Submission Date : Strictly on or before 21st June'19 up to 4.00 pm. Please note, wearing of Flat Sole Leather Shoes at the time inspection is mandatory.

TATA
Sr. MANAGER (SCM)
TATA MOTORS LTD.
PIMPRI, PUNE: 411 018.

JM FINANCIAL
जेएम फायनान्शिअल ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड
(पूर्वीची जेएम फायनान्शिअल ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी प्रायव्हेट लिमिटेड)
कॉर्पोरेट ओळख क्र.: U67190MH2007PLC174287

नोंद. कार्यालय : सातवा मजला, सिनर्जी, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५
प्राधिकृत अधिकारी : मिताक्षी अशार, ईमेल : **mitakshi.ashar@jmflcom,**
मोबाइल : +९१ ९८३३४६२२२८; फोन : +९१ ०२२ ६२२४ १६६४; ०२२- ६६३० ३४९३;
वेबसाइट : www.jmfinancialarc.com

परिशिष्ट-IV-अ
अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२ मधील नियम ८(६) सह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारे कर्जदार व/किंवा सह-बाध्यताधारी, गहाणदार तसेच सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की, जेएम फायनान्शिअल ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड (पूर्वीची जेएम फायनान्शिअल ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी प्रायव्हेट लिमिटेड) यांच्याकडे तारण/भारग्रस्त असलेल्या खाली नमूद करण्यात अचल मालमत्तेचा सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी ताबा घेतलेला असून त्यांच्याद्वारे जेएमएफएआरसी-कर्नाटक बँक डिसेंबर २०१४ ट्रस्ट ("सुरक्षित धनको")चे विश्वस्त म्हणून काम करणारे म्हणून सदर मालमत्तेची दि. १६ जुलै, २०१९ रोजी स. ११.०० ते दु. १२.०० वाजेपर्यंत मे. मॅक्सवेल मेटॅलिक वायर्स प्रा.लि. ("कर्जदार") तसेच सह-बाध्यताधारी व/किंवा गहाणदार (i) श्री. वैभव वेदप्रकाश गुप्ता (सह-बाध्यताधारी) (ii) श्री. मयंक वेदप्रकाश गुप्ता, (सह-बाध्यताधारी) (iii) श्री. वेदप्रकाश गुप्ता (सह-बाध्यताधारी/गहाणदार), (iv) सौ. सुनीता वेदप्रकाश गुप्ता (सह-बाध्यताधारी/गहाणदार) यांच्याकडून सुरक्षित धनकोस दि. २५ जुलै, २०१३ नुसार घेणे असलेल्या रु. ३,७२,४५,८३०.०६/- (रुपये तीन कोटी बहात्तर लक्ष पंचेचाळीस हजार आठशे तीस आणि सहा पैसे फक्त) अधिक दि. २६ जुलै, २०१३ पासून वसुलीच्या दिनांकापर्यंतचे व्याज आणि पुढील शुल्क व इतर खर्च इ.च्या वसुलीसाठी "जशी आहे, जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे" आणि "जे काही आहे तेथेच आहे" तत्त्वावर विक्री करण्यात येईल. अचल मालमत्तेचे तपशील, तिची आरक्षित किंमत आणि बयाणा रक्कम पुढीलप्रमाणे आहे :

लॉट क्र.	मालमत्तेचे वर्णन	आरक्षित किंमत (लक्ष)	बयाणा रक्कम (लक्ष)
१.	निवासी सदनिका क्र. ४१८, क्षेत्रफळ सुमारे १०१० चौ.फू. सुपर बिल्टअप, चौथा मजला, एफ विंग, गौरव गार्डन को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि., जुना सर्व्हे क्र. ३६०/२, ३६१/२, ३६१/७, ३६१/८ (काही भाग) ३६१/१० आणि ३६२/२ आणि नवीन सर्व्हे क्र. ६५/२, ८०/२, ८०/७, ८०/८ (काही भाग) ८०/१० व ७२/२, घोडदेव गाव (भायंदर), तालुका व जिल्हा ठाणे, मिरा-भायंदर महानगर परिषद.	रु. ७२.०० लक्ष (रुपये बहात्तर लक्ष फक्त)	रु. १०.०० लक्ष (रुपये दहा लक्ष फक्त)

टीप : संभाव्य बोलीदारांना जेएम फायनान्शिअल ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड यांना ज्ञात नसलेल्या इतर बोज्यांचा खर्च उचलावा लागेल.

वीज देणी	रु. ५३२.००
ऑगस्ट २०१८ अनुसार देय असलेली सोसायटी देखभाल देणी	रु. २,०६,१४५.००

जेएम फायनान्शिअल ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड यांना माहीत नसलेला अन्य भार प्रस्तावित बोलीदाराला भरावा लागेल.
विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशिलासाठी कृपया सुरक्षित धनकोच्या वेबसाइटवर म्हणजे **https://www.jmfinancialarc.com/assets-for-sale** येथे दिलेली लिंक पाहावी.

स्वा/-
प्राधिकृत अधिकारी
जेएम फायनान्शिअल ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड
जेएमएफएआरसी- कर्नाटक बँक डिसेंबर २०१४- ट्रस्टचे विश्वस्त म्हणून काम करणारे
दिनांक : १५ जून, २०१९
ठिकाण : ठाणे

दि. १६.०६.२०१९ रोजी कळंबोली येथे ट्रॅफिक ब्लॉक

रविवार दि. १६.०६.२०१९ रोजी इनडोअर व आऊटडोअर सिग्नलिंग गीअर बदलून त्या जागी नवीन रूट रीले इन्टरलॉकिंग बसविण्यासाठी कळंबोली स्थानक येथे ०९.५० ते १२.५० वाजेपर्यंत (३ तास) आणि कळंबोली यार्ड येथे ०७.०० ते १५.०० वाजेपर्यंत अप व डाऊन लाइनवर मध्य रेल्वेद्वारे ट्रॅफिक ब्लॉक राबविण्यात येईल.

सदर ब्लॉकमुळे रेल्वेगाड्यांच्या धावण्याची पद्धत खालीलप्रमाणे असेल :

दि. १६.०६.२०१९ रोजी सुरू होणारे रेल्वे प्रवास रद्द होणे
गाडी क्र. १२१२५/१२१२६ सीएसएमटी मुंबई-पुणे-सीएसएमटी मुंबई प्रगती एक्स्प्रेस

दि. १६.०६.२०१९ रोजी डाऊन एक्स्प्रेस गाड्यांचे नियमन
- दि. १६.०६.२०१९ रोजी लो. टि. ट. येथून सुटणारी १६३४५ एलटीटी-तिरुअनंतपुरम नेत्रावती एक्स्प्रेस तळोजा पंचनंद येथून १२.३६ ते १२.५० पर्यंत थांबविण्यात येईल आणि ती २५ मिनिटे उशिरा धावेल.
- १९५७८ जामनगर-तिरुनेलवेल्ली एक्स्प्रेस निळजे येथे १० मिनिटे थांबविण्यात येईल आणि ती २५ मिनिटे उशिरा धावेल.

दि. १६.०६.२०१९ रोजी अप प्रवासी गाड्यांचे नियमन
- ५०१०४ रत्नागिरी-दादर-पॅसेंजर पनवेल येथे थांबविण्यात येईल आणि ती दादर येथे ३०-३५ मिनिटे उशिरा पोहोचेल.

प्रवाशांना होणाऱ्या त्रासाबद्दल प्रशासन दिलगिरी व्यक्त करते आणि त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी प्रशासनास सहकार्य करावे.

मध्य रेल्वे
www.cr.indianrailways.gov.in
www.facebook.com/centralrailwayindia
www.twitter.com/Central_Railway
311
www.twitter.com/central_railway www.facebook.com/centralrailwayindia

टाटा मोटर्स लिमिटेड
कॉर्पोरेट आयडेन्टिटी नं. (सीआयएन) : एल२८९२०एमएच१९४५पीएलसी००४५२०
नोंदणीकृत कार्यालय : बॉम्बे हाऊस, २४, होमी मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
टेलि. नं. : +९१ २२ ६६६५ ८२८२; ई-मेल : inv_rel@tatamotors.com
वेबसाइट : **www.tatamotors.com**

सूचना

इन्व्हेस्टर एज्युकेशन ॲण्ड प्रोटेक्शन फंड (आयईपीएफ) ॲथोरिटीकडे कंपनीच्या सामान्य भाग आणि 'ए' सामान्य भागांचे ("भाग") स्थानांतरण

इन्व्हेस्टर एज्युकेशन ॲण्ड प्रोटेक्शन फंड ॲथोरिटी (अकाऊन्टिंग, ऑडिट, ट्रान्स्फर ॲण्ड रिफंड) नियम, २०१६ आणि वेळोवेळी सुधारित केलेल्या "नियमा"नुसार यासह वाचलेल्या कंपन्या अधिनियम, २०१३ ("अधिनियम")च्या लागू तरतुदींच्या अनुसार याद्वारा सूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. नियमांमध्ये आयईपीएफ ॲथोरिटीकडे स्थानांतरण, तत्सम भाग तसेच सलग सात वर्षे किंवा अधिक कालावधीकरिता प्रदान न झालेल्या किंवा दावा न करता राहिलेल्या लाभांशाची रक्कम, ज्याकरिता लाभांशाच्या रकमेचा सलग सात वर्षे किंवा अधिक कालावधीकरिता दावा केलेला नाही किंवा प्रदान झालेले नाही, याबाबत तरतूद करण्यात आली आहे.

उक्त नियमांच्या अनुपालनार्थ, कंपनीने, दिनांकित ११ जून, २०१९ पत्राद्वारा प्राप्य वैध दाव्यांकरिता शेवटची तारीख आणि लाभांश दाव्यांची रक्कम याबाबत संबंधित भागधारकांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर स्वतंत्ररीत्या कळविण्यात आ